## राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०१/०७/२०२४ अखेरचा खरीप हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

- **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. कोल्हापूर विभागात बहुतांश ठिकाणी तर नाशिक, पुणे, लातूर, अमरावती, नागपूर विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **खरीप हंगाम-२०२४-२५ :**
- **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.०२ लाख हेक्टर असून दि.०१ जुलै, २०२४ अखेर ७९.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर (५६%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून ८०.०२ लाख हेक्टर क्षेत्रावर (५२%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०३.०७.२०२३ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र २०.६० लाख हे. (सरासरीशी १३%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र २०.५२ लाख हे. (सरासरीशी १४%) होते.

- भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
- भात पिकाच्या पुर्नलागवडीच्या कामांना सुरुवात झाली आहे.
- जेथे पाण्याची सुविधा उपलब्ध आहे तेथे भात पिकाच्या धुळवाफ पेरण्या झाल्या असून त्यांची उगवण झाली आहे.
- ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग, कापूस पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

**पर्जन्यमान (२०२४)**

दि.१ जून ते ०१ जुलै, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस २१८.३ मि.मी. असून दि.०१ जुलै, २०२४ पर्यंत २३६.२ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०८.२ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.०१.०७.२०२३ अखेर १२२.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ५६.२ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.०१ जुलै, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | ---- |
| २ | २५ ते ५० % | १ | भंडारा. |
| ३ | ५० ते ७५ % | ५ | रायगड, कोल्हापूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १० | ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग,नाशिक, नंदुरबार, पुणे, नांदेड, अमरावती, वर्धा, नागपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १८ | रत्नागिरी, जळगांव, धुळे, बुलढाणा, अकोला, लातूर, परभणी, हिंगोली,जालना, बीड, धाराशिव, सातारा, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, सांगली, सोलापूर, वाशिम, यवतमाळ. |


राज्यात दि.०१ जुलै, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, २१ तालुक्यात २५ ते ५०%, ५१ तालुक्यात ५० ते ७५%, ७७ तालूक्यात ७५ ते १००% तर २०६ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

❖ **नैसर्गिक आपत्ती :**


दि.०१ जुलै, २०२४ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, जून-२०२४ मधील पावसामुळे शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १५७१ हे. क्षेत्र बाधित झाले आहे.

❖ **किड व रोग : निरंक.**

## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी
(दि.०१ जुलै, २०२४ अखेर)




## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.०१ जुलै, २०२४ अखेर)



# विभाग निहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या तर बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१४ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर ०.१६ लाख हेक्टर क्षेत्रावर (४%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.
  - इतर पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.६५ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर ९.५२ लाख हेक्टर क्षेत्रावर (४६%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - कापूस पिकाच्या लागवडीची कामे सुरु आहेत.
  - बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरणीस वेग आला आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## पुणे विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर ७.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (७२%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - चालु सप्ताहात झालेल्या पर्जन्यमानामुळे पेरणीच्या कामांना वेग आला आहे.
  - बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.२८ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर ३.७४ लाख हेक्टर क्षेत्रावर (५१%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - जेथे पाण्याची सुविधा उपलब्ध आहे तेथे भात पिकाच्या धुळवाफ पेरण्या झाल्या असून त्यांची उगवण झाली आहे.
  - सोयाबीन टोकणीची कामे सुरु आहेत.
  - विभागात खरीप हंगामातील बाजरी, मका, सोयाबीन, उडीद, मूग पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग : निरंक.**

## छ.संभाजीनगर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर १६.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (७९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस, भूईमूग पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग : निरंक.**

## लातूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर १८.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर (६७%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.५९ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर १६.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (५३%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील मका, ज्वारी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
  - पेरणी झालेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१५ लाख हेक्टर असून, दि.०१ जुलै, २०२४ अखेर ६.६० लाख हेक्टर क्षेत्रावर (३४%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या रोपवाटिका तयार करण्याची कामे पुर्ण झाली असून रोपवाटिकेतील भात रोपे अवस्थेत आहे.
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामांना सुरुवात झाली आहे.
  - सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी पिकांच्या पेरणीची कामे प्रगतीपथावर आहेत.
  - सोयाबीन, तूर, कापूस पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहे.
  - पेरणी झालेली इतर पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :** निरंक.

- **प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप-२०२४) :**
  - **शेतकरी सहभाग संख्या : ४६.११ लाख**
  - **विमा संरक्षित क्षेत्र : २९.१७ लाख हे.**

# महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.०१.०७.२०२४ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | पिके | पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागिल वर्षाची दि.०३.०७.२०२३ रोजीची पेरणी | सन २०२४-२५ मधील दि.०१.०७.२०२४ अखेर प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१) | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | स्तंभ ५ ची स्तंभ ३ च्या तुलनेत % | स्तंभ ५ ची स्तंभ ४ च्या तुलनेत % |
| १ | भात | १५०८३७४ | ७०२४६ | १२३८०० | ८ | १७६ |
| २ | खरीप ज्वारी | २८८६१५ | ५९७४ | २९१६३ | १० | ४८८ |
| ३ | बाजरी | ६६९०८९ | ७२२२ | २१२९६२ | ३२ | २९४९ |
| ४ | रागी | ७८१४९ | ३२३७ | ६३३५ | ८ | १९६ |
| ५ | मका | ८८५६०८ | ७२२३३ | ५८८४५२ | ६६ | ८१५ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४०४४५ | ४०४ | ४३३३ | ११ | १०७३ |
| **एकूण तृणधान्य** | | **३४७०२७९** | **१५९३१५** | **९६५०४४** | **२८** | **६०६** |
| ७ | तूर | १२९५५१६ | १४६४२९ | ६६८२७७ | ५२ | ४५६ |
| ८ | मुग | ३९३९५७ | ६३६८ | १३८८५३ | ३५ | २१८१ |
| ९ | उडीद | ३७०२५२ | ५५०१ | २०९५२१ | ५७ | ३८०९ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ७८८४५ | ८९० | १७५९१ | २२ | १९७७ |
| **एकूण कडधान्य** | | **२१३८५७१** | **१५९१८७** | **१०३४२४१** | **४८** | **६५०** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५६०८८५०** | **३१८५०२** | **१९९९२८५** | **३६** | **६२८** |
| ११ | भुईमुग | १९१५७५ | २१८०८ | ७६४३० | ४० | ३५० |
| १२ | तीळ | १५१६२ | ३५ | ४९८७ | ३३ | १४२२३ |
| १३ | कारळ | १२४६० | ६७ | ३९४ | ३ | ५८८ |
| १४ | सुर्यफुल | १३७८० | १५ | ४३३५ | ३१ | २८९०० |
| १५ | सोयाबीन | ४१४९९१२ | ४७३२३२ | ३०९७९१७ | ७५ | ६५५ |
| १६ | इतर गळीतधान्य (एरंडी, इतर) | ९४५२ | ४११ | ४०५ | ४ | ९९ |
| **एकूण तेलबिया** | | **४३९२३४०** | **४९५५६९** | **३१८४४६८** | **७३** | **६४३** |
| **१७** | **कापूस** | **४२०११२८** | **१२३७८५५** | **२७६९६७१** | **६६** | **२२४** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | | **१४२०२३१८** | **२०५१९२५** | **७९५३४२४** | **५६.००** | **३८८** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **१०९५०७५** | **७५८८** | **४८८७१** | **४** | **६४४** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५२९७३९४** | **२०५९५१३** | **८००२२९५** | **५२.३१** | **३८९** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.